विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१,
१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.
दुरध्वनी क्र.-०२०-२६१२२२१७, ई मेल आय डी क्र. dydpune@gmail.com, वेब साईट-www.dydepune.com

जा क्र.शिउसं/उमावि-४०२/पुवि/महाडीबीटी/२०१८-१९/७०४८
दि. ~~18 JAN 2019~~ - ~~1 JAN 2019~~
- 1 FEB 2019

प्रति,

प्राचार्य,
सर्व अनुदानित,विनाअनुदानित/स्वयंअर्थसहाय्यित माध्यमिक शाळा/
कनिष्ठ महाविद्यालये/ उच्च माध्यमिक विद्यालये, **अहमदनगर/सोलापूर**

**विषयः- प्राचार्य/मुख्याध्यापक यांची सहविचार सभा**

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार आपणांस कळविण्यात येते की, विद्यार्थ्यांचे सर्व ऑनलाईन शिष्यवृत्यांचे आवेदनपत्रे सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून **MAHADBT** या ऑनलाईन पोर्टलद्वारे स्विकृत करण्यात येणार आहे.

या पत्रान्वये आपणांस सुचित करण्यात येते की, आपल्या उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्रकारच्या शिष्यवृत्तीस पात्र ठरणा-या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन आवेदनपत्रे www.mahadbtmahit.gov.in या शासकीय स्कॉलरशिपच्या अधिकृत वेबसाईटवरील आवश्यक ते कागदपत्रे अपलोड करुन ऑनलाईन अर्ज/आवेदनपत्रे दिलेल्या बेबसाईटवर दि. ०८.०२.२०१९ पर्यंत भरण्याबाबत खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे प्रशिक्षण वर्गाचे अयोजन करण्यात आले आहे. सदर प्रशिक्षण वर्गात वर्गात आपणांस ऑनलाईन अर्ज भरणेबाबत माहिती देण्यात येणार आहे. सदर प्रशिक्षण वर्गांसाठी प्राचार्य व उपप्राचार्य तसेच स्कॉलरशिपचे कामकाज करणारे लिपीक यांची उपस्थित आवश्यक आहे. प्रतिनिधी पाठवू नये तसेच सदर बैठकीत पूढील प्रशासकीय विषयावर चर्चा होणार असून संबधित विषयाची माहिती सोबत आणावी.

१. महाडिबीटी (**MAHADBT**) – शिष्यवृत्तीसाठी प्राप्त अर्ज, अडचणी, शिल्लक अर्ज संख्या
२. इ. १२ वी प्रात्यक्षिक परिक्षा नियोजन
३. इ.१२ वी गुणवत्ता वाढीसाठी करावयाचे विशेष प्रयत्न
४. ३३ कोटी वृक्ष लागवड अंतर्गत सन-२०१९ मध्ये प्रत्येक शाळेत/कमवि मध्ये किमान १० वृक्ष/ रोपे लागवड करणे व त्यांचे संवर्धनाबाबतचे नियोजन
५. शालेय परिवहन समिती अंतर्गत इ. ११ वी व १२ वी मध्ये विद्यार्थ्यांसाठी वाहतुक नियमावली बाबतची जागरुकता, प्रबोधनाबाबत स्थानिक वाहतुक पोलिसांच्या मदतीने स्थानिक पोलिस स्टेशन तसेच प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या मार्फत व्याख्यानमाला आयोजित करणेबाबत.
६. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत शालेय स्वच्छता गृह, पिण्याचे पाणी, शालेय परिसर, इमारत वर्ग खोल्या, इ. भौतिक परिसराविषयीचे नियोजन.
७. पवित्र पोर्टलबाबतची कार्यवाही- रोस्टर तपासणी (बिंदुनामावली)
८. तंबाखुमुक्त/व्यसनमुक्त विद्यालय अभियान

| अ.क्र. | जिल्हयाचे नांव | समाविष्ठ क्षेत्र | प्रशिक्षण वर्गाचे ठिकाण | दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | अहमदनगर | अहमदनगर जिल्हा | राजश्री शाहू हॉल, ग्रंथालय इमारती शेजारी, न्यू आर्टस, सायन्स अॅन्ड कॉमर्स कॉलेज ,अहमदनगर | दि.०५.०२.२०१९ वेळ स.११.०० ते २.०० वाजेपर्यंत |
| २ | सोलापूर | सोलापूर जिल्हा | वालचंद महाविद्यालय, सोलापूर | दि. ०६.०२.२०१९ वेळ स.११.०० ते २.०० वाजेपर्यंत |



Scanned by CamScanner

प्रशिक्षणाचे ठिकाणी तक्त्यात नमूद केलेले कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य यांनी प्रशिक्षणासाठी आवश्यक असलेल सर्व सोईसुविधा/एलसीडी/ओएपी प्रोजेक्टर उपलब्ध करुन दयावेत.

सदरचे परिपत्रक प्रस्तुत कार्यालयाचे या संकेतस्थळावर www.dydepune.com उपलब्ध आहे.

MRaut

(मिनाक्षी राऊत)
प्र.शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग,पुणे-१

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :-**

१) मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

२) मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा पुणे-१

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

**शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.अहमदनगर/सोलापूर**

यांना कळविण्यात येते की, सदर प्रशिक्षणासाठी आवश्यकती बैठक व्यवस्था व नियोजन करण्याची दक्षता घ्यावी.



Scanned by CamScanner